# परभणी जिल्हा पोलीस भरती-2016

१. **पुढील व्हाईसरॉयची त्यांच्या कारकिर्दीनुसार सुरूवातीपासून ते अलीकडच्या काळापर्यंत मांडणी करा.**

१) लॉर्ड लिटन १) लॉर्ड कर्झन ३) लॉर्ड कॅनींग ४) लॉड मेयो

अ) १,२,३,४ ब) ४,१,२,३ क) ३,४,१,२ ड) २,३,४,१

२. **खालीलपैकी कोणत्या ठिकाणी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ आहे?**

अ) कोल्हापूर, औरंगाबाद ब) औरंगाबाद, नागपूर

क) अहमदनगर, नागपूर ड) अहमदनगर, कोल्हापूर

३. **शरीरामध्ये अ जिवनसत्वाची कमतरता निर्माण झाल्यास खालीलपैकी कोणता रोग होतो?**

अ) स्कर्व्ही ब) बेरीबेरी क) मुडदूस ड) रातआंधळेपणा

४. **खालीलपैकी कोणती जोडी चुकीची आहे?**

अ) राजवर्धन राठोड-माहिती व प्रसारण राज्यमंत्री

ब) किरेन रिजीजू-वित्त राज्यमंत्री

क) मेनका गांधी-महिला व बालकल्याण राज्यमंत्री

ड) प्रकाश जावडेकर- पर्यावरण राज्यमंत्री

५. **खालीलपैकी कोणता परभणी जिल्ह्यातील तालुका नाही?**

अ) मानवत ब) पालम क) बोरी ड) गंगाखेड

६. **सन २०१५ चा उत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार खालीलपैकी कोणत्या चित्रपटाला मिळाला आहे?**

अ) पिकु ब) नटसम्राट क) पानसिंग तोमर ड) कोर्ट

७. **लोकसभेची सदस्य संख्या किती आहे?**

अ) ५१२ ब) ५६२ क) ५४५ ड) ५४२

८. **जो करेल तो भरेल या वाक्याचा प्रकार ओळखा.**

अ) साधे वाक्य ब) मिश्र वाक्य क) संयुक्त वाक्य ड) वरीलपैकी सर्व

९. **खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा.**

अ) घृष्णेश्वर-जालना ब) हुजुरसाहीब गुरूद्वारा-नांदेड

www.bhartijahirat.com

क) सय्यद तुराबउलहक-परभणी ड) औंढा नागनाथ-हिंगोली

१०. खालील वाक्यातील अधोरेखीत क्रियाविशेषण अव्यायाचा प्रकार ओळखा.

सभोवार हिरवळ पसरली होती

अ) कालवाचक ब) स्थलवाचक क) रितीवाचक ड) परिणामवाचक

११. शेतकऱ्यांचा आसुड हे पुस्तक खालीलपैकी कोणी लिहीले आहे.

अ) महात्मा ज्योतीबा फुले ब) बाबासाहेब आंबेडकर

क) डॉ.पंजाबराव देशमुख ड) वरील पैकी नाही

१२. खालीलपैकी कोणत्या राज्याची सीमा महाराष्ट्राला लागून नाही?

अ) छत्तीसगड ब) गुजरात क) गोवा ड) ओरीसा

१३. महेंद्रसिंग धोनी हा खालील पैकी कोणत्या राज्याचा आहे?

अ) राजस्थान ब) बिहार क) झारखंड ड) मध्यप्रदेश

१४. भारतीय महिला क्रिकेट संघाची सध्याची कर्णधार कोण आहे?

अ) अंजुम चोपडा ब) झुलन गोस्वामी क) मिथाली राज ड) हरमनप्रीत कौर

१५. एका काटकोन त्रिकोणाचे क्षेत्रफळ ३२ चौ.सें.मी. असुन त्याचा पाया ८ सें.मी. असल्यास त्याची उंची किती?

अ) ३ सेंमी ब) ८ सेंमी क) ५ सेंमी ड) ६ सेंमी

१६. खालीलपैकी कोण सध्या जहाज बांधणी खात्याचे (Shipping) केंद्रीय कॅबीनेट मंत्री आहेत?

अ) सुरेश प्रभु ब) नितीन गडकरी क) मनोहर पर्रीकर ड) अनंत गिते

१७. भारतीय संरक्षण प्रबोधीनी खालीलपैकी कोणत्या ठिकाणी आहे?

अ) डेहराडुन ब) पुणे क) नागपूर ड) अहमदनगर

१८. पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा. पोलिसांनी चोर पकडला

अ) कर्तरी प्रयोग ब) कर्मणी प्रयोग क) भावे प्रयोग ड) वरील पैकी नाही

१९. खालीलपैकी कोण अष्टप्रधान मंडळाचा भाग आहे?

अ) पंतप्रधान-पेशवा ब) वित्त-अमात्य

क) विदेश-सुमंत ड) वरीलपैकी सर्व

२०. बावळी मुद्रा देवळी निद्रा, या म्हणीचा अर्थ ओळखा.

www.bhartijahirat.com

अ) बावळी मुद्रा घेवुन देवळात निजणारा

ब) शहाणपणाचे सोंग आणणारा मुर्ख

क) दिसण्यात बावळा पण व्यवहारात चतुर

ड) वरील पैकी नाही

**२१. खालील राजकीय पक्ष व त्यांचे स्थापना वर्ष यांची योग्य जोडी ओळखा.**

अ) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-१८८५ ब) राष्ट्रवादी काँग्रेस-२००६

क) शिवसेना-१९६० ड) महाराष्ट्र नवनिर्माण सेना-२०१०

**२२. जगातील सर्वात उंच धबधबा कोणता आहे?**

अ) नायगारा फॉल्स ब) एंजल फॉल्स क) जोग फॉल्स ड) व्हिक्टोरीया फॉल्स

**२३. सन २०१६ मध्ये २०-२० विश्वचषक स्पर्धा खालील पैकी कोणत्या देशाने जिंकली?**

अ) न्युझीलंड ब) इंग्लंड क) ऑस्ट्रेलीया ड) वेस्ट इंडीज

**२४. खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा.**

अ) केळी-जळगांव ब) संत्री-सांगली क) आंबा-रत्नागिरी ड) द्राक्षे-नाशिक

**२५. एका चौरसाची एक बाजु १० सेंमी असल्यास त्याचे क्षेत्रफळ किती?**

अ) ४० चौसेंमी ब) ५० चौ.सेंमी क) १०० चौ.सेंमी ड) २०० चौ.सेंमी

**२६. जर $a+b$ = ७ , $a-b$=२ तर $a^2-b^2$=?**

अ) १४ ब) ५ क) ९ ड) ३.५

**२७. सन २०१६ मध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून खालीलपैकी कोण उपस्थित होते?**

अ) पाकीस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ

ब) फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष फ्रान्सिस ओलाँद

क) ब्रिटनचे पंतप्रधान डेव्हीड कॅमेरून

ड) अमेरीकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा

**२८. नागपुरी संत्री हे .................. विशेषण आहे.**

अ) नामसाधित ब) धातुसाधित क) सार्वनामिक ड) अव्ययसाधित

**२९. सुर्य मालेतील सर्वात मोठा ग्रह कोणता?**

अ) मंगळ ब) गुरू क) शनि ड) पृथ्वी

www.bhartijahirat.com

**३०. चर्पट पंजरी या अलंकारीक शब्दाचा अर्थ ओळखा.**

अ) निरर्थक बडबड ब) पोपट क) पाठांतर ड) शत्रुत्व

**३१. राजकीय चळवळीसाठी चतु:सुत्रीचा कार्यक्रम भारतीय जनतेपुढे कोणी मांडला?**

अ) दादाभाई नौरोजी ब) लोकमान्य टिळक क) महात्मा गांधी ड) जवाहरलाल नेहरू

**३२. खालीलपैकी कोणत्या जिल्ह्याची सीमा परभणी जिल्ह्याला लागुन नाही?**

अ) लातुर ब) बीड क) जालना ड) उस्मानाबाद

**३३. खालीलपैकी कोण प्रसिद्ध सतारवादक आहे?**

अ) उस्ताद बिस्मील्लाखाँ ब) पंडीत रवीशंकर

क) भिमसेन जोशी ड) शिवकुमार शर्मा

**३४. इडन गार्डन क्रिकेटचे स्टेडीयम/ मैदान कोठे आहे?**

अ) कोलकाता ब) बंगळुरू क) दिल्ली ड) चेन्नई

**३५. मराठवाडा मुक्ती संग्राम दिन कोणत्या दिवशी साजरा केला जातो.**

अ) १३ सप्टेंबर ब) १५ सप्टेंबर क) १७ सप्टेंबर ड) १९ सप्टेंबर

**३६. खालीलपैकी कोणत्या ठिकाणी पोलीस आयुक्तालय नाही?**

अ) औरंगाबाद ब) अमरावती क) कोल्हापुर ड) सोलापुर

**३७. खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा.**

अ) भरतनाट्यम-तामीळनाडू ब) ओडीसी-ओरीसा

क) कथकली-केरळ ड) कुचीपुडी-कर्नाटक

**३८. बारभाई या शब्दाचा समास ओळखा.**

अ) कर्मधारय समास ब) मध्यम पदलोपी तत्पुरूष समास

क) विभक्ती तत्पुरूष समास ड) द्विगू समास

**३९. खालील पेशव्यांची त्यांच्या कालानुक्रमे सुरूवातीपासून अलीकडच्या कालापर्यंत मांडणी करा.**

अ) बाळाजी विश्वनाथ ब) पहिले बाजीराव

क) बाळाजी बाजीराव ड) पहिले माधवराव

अ) अ, ब, क, ड ब) ब,ड,क,अ क) ब,अ,ड,क ड) क,ब,अ,ड

**४०. खालील वाक्यातील अधोरेखीत शब्दयोगी अव्ययाचा प्रकार ओळखा.**

www.bhartijahirat.com

दगडापरीस विट मऊ

अ) स्थलवाचक ब) कालवाचक क) तुलनावाचक ड) हेतूवाचक

**४१. पुढील युद्धांची त्यांच्या कालानुक्रमे सुरूवातीपासून ते अलीकडच्या काळापर्यंत मांडणी करा.**

अ) बक्सारचे युध्द ब) प्लासीचे युध्द क) तिसरे पानिपत युध्द ड) चौथे इंग्रज म्हैसुर युध्द

अ) अ,ब,क,ड ब) क,ब,अ,ड क) क,ड,ब,अ ड) ब,क,अ,ड

**४२. राम व रहीम हे दोघे विरूध्द दिशेने एकमेकांकडे येत आहेत, राम हा ३० मिटर प्रती मिनीट या वेगाने व रहीम ४० मीटर प्रती मिनीट या वेगाने येत आहे. दोघे १० मिनीटानंतर एकमेकांना भेटतात तर दोघांमधील सुरूवातीचे अंतर किती?**

अ) ७०० मीटर ब) ८०० मीटर क) ६०० मीटर ड) ४०० मीटर

**४३. खालीलपैकी कशामुळे मलेरीयाचा प्रादुर्भाव होतो?**

अ) घरमाशी ब) मधमाशी क) ॲनाफीलीस डासाची मादी ड) ढेकुण

**४४. बलात्कार पिडीत महिलांसाठी आर्थिक मदतीकरीता खालीलपैकी कोणती योजना कार्यान्वीत आहे?**

अ) सुकन्या योजना ब) दामिनी योजना क) बेटी बचाव योजना ड) मनोधैर्य योजना

**४५. भारतात सध्या एकुण किती राज्ये आहेत?**

अ) २६ ब) २७ क) २८ ड) २९

**४६. खालीलपैकी कोणता चढता क्रम पोलीस दलातील हुद्यानुसार बरोबर आहे?**

अ) सपोउपनि, पोउपनि, सपोनि, पोनि ब) सपोनि, पोउपनि, सपोउपनि, पोनि

क) सपोउपनि, पोउपनि, पोनि, सपोनि ड) पोनि, सपोनि, सपोउपनि, पोउपनि

**४७. खालीलपैकी कोणते साहित्य संगणकाचा भाग नाही?**

अ) ॲन्टेना ब) माऊस क) कि बोर्ड ड) मदरबोर्ड

**४८. उन्हाच्या झळा सोसणे या वाक्प्रचाराचा खालीलपैकी योग्य अर्थ ओळखा.**

अ) उन्हाचे चटके सहन करणे ब) उष्माघात होणे

क) उन्हाळ्याचा त्रास होणे ड) दुःख सहन करणे

**४९. खालील पैकी चूकीची जोडी ओळखा.**

www.bhartijahirat.com

अ) प्रतापगड-सातारा ब) नर्नाळा-अकोला

क) दौलताबाद-औरंगाबाद ड) शिवनेरी-रायगड

**५०. रिती भुतकाळातील क्रियापद ओळखा.**

अ) चालत असे ब) चालत होता क) चालला ड) चालला होता

**५१. खालीलपैकी लेखक व त्यांची पुस्तके यांची योग्य जोडी ओळखा.**

अ) लक्ष्मण माने- झाडाझडती ब) आनंद यादव-उपरा

क) विश्वास पाटील-झोंबी ड) वि.स.खांडेकर-ययाती

**५२. महाराष्ट्र राज्याचे सध्याचे राज्यपाल कोण आहेत?**

अ) सी विद्यासागर राव ब) के सत्यनारायणा

क) के शंकर नारायण ड) एस एम कृष्णा

**५३. १२३४५ x ५६७८९ = ?**

अ) १२३४५६७८९ ब) ७११६०२०१५ क) ७०१०६०२०५ ड) ७१०६०१६५५

**५४. खालीलपैकी फेसबुकचे संस्थापक कोण आहेत?**

अ) स्टीव्ह जॉब्ज ब) बिल गेटस् क) मार्क झुकरबर्ग ड) वॉरन बफेट

**५५. बोका या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप ओळखा.**

अ) भाटी ब) मांजर क) बोकी ड) वरील पैकी नाही

**५६. ४ आंबे व ६ संत्रे यांची खरेदी किंमत २४ रूपये आहे. व तीन आंबे व पाच संत्रे यांची खरेदी किंमत १९ रूपये आहे तर दोन आंबे व दहा संत्रे यांची खरेदी किंमत किती?**

अ) २४ रूपये ब) २६ रूपये क) २२ रूपये ड) २० रूपये

**५७. खालीलपैकी चाईल्ड हेल्प लाईनचा नंबर कोणता आहे?**

अ) १०९८ ब) १०९७ क) १०९४ ड) १०९१

**५८. पुढील नामाचा प्रकार ओळखा- वात्सल्य**

अ) सामान्य नाम ब) भाववाचक नाम क) विशेषनाम ड) धातूसाधित नाम

**५९. खालीलपैकी कोणते पुस्तक डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांनी लिहीलेले नाही?**

अ) विंग्ज ऑफ फायर ब) इंडिया २०२०

क) इग्नायटेड माईन्डस ड) इमॅजीनींग इंडीया

**६०. चाफेकर बंधुनी पुढीलपैकी कोणाची हत्या केली?**

www.bhartijahirat.com

अ) रँड ब) जॅक्सन क) सायमन ड) डॅनीयल

**६१. आसाम राज्याची राजधानी कोणती आहे?**

अ) दिमापुर ब) दिसपूर क) दिग्बोई ड) गुवाहाटी

**६२. खालीलपैकी कोणता प्राणी राजमुद्रेवर नाही?**

अ) हत्ती ब) सिंह क) बैल ड) घोडा

**६३. सन २०१६ मध्ये युरो कप फुटबॉल स्पर्धा खालीलपैकी कोणत्या देशात खेळविण्यात आल्या?**

अ) जर्मनी ब) फ्रान्स क) इटली ड) स्पेन

**६४. ताडोबा व्याघ्र प्रकल्प खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात आहे?**

अ) गडचिरोली ब) गोंदिया क) चंद्रपुर ड) भंडारा

**६५. खालीलपैकी विकारी नसलेली शब्दांची जात ओळखा.**

अ) नाम ब) सर्वनाम क) क्रियापद ड) क्रियाविशेषण

**६६. मोहन हा परभणी येथुन जालना येथे ६० कि.मी. प्रती तास या वेगाने २ तासात पोहोचतो. परत येतांना तो ४० कि.मी.प्रती तास या वेगाने आल्यास त्यास परभणी येथे पोहचण्यास किती वेळ लागेल?**

अ) १५० मिनीटे ब) २०० मिनीटे क) १८० मिनीटे ड) १६० मिनीटे

**६७. खालीलपैकी कोणती संयुक्त राष्ट्रसंघटनेची (युनो) पुरक संघटना नाही?**

अ) शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक परिषद

ब) जागतिक आरोग्य परिषद

क) आंतरराष्ट्रीय मजुर संघटना

ड) रेड क्रॉस

**६८. निः+विकार या संधी विग्रहाचा मुळ शब्द ओळखा.**

अ) नि:विकार ब) निंविकार क) निर्विकार ड) वरीलपैकी नाही

**६९. भारताचा क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगात ..............वा क्रमांक लागतो.**

अ) ५ ब) ६ क) ७ ड) ८

**७०. खालील वाक्यातील अधोरेखीत उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.**

नोकरी मिळावी **म्हणून** तो शहरात आला

www.bhartijahirat.com

अ) परिणामबोधक ब) स्वरूपबोधक क) उद्देशबोधक ड) संकेतबोधक

**७१. खालील समाजसुधारक व त्यांनी स्थापन केलेल्या संस्था यांची योग्य जोडी ओळखा.**

अ) राजा राममोहन रॉय-आर्य समाज ब) स्वामी दयानंद सरस्वती-रामकृष्ण मिशन

क) महात्मा ज्योतीबा फुले-सत्यशोधक समाज ड) स्वामी रामकृष्ण परमहंस-ब्राम्हो समाज

**७२. खालीलपैकी कोणती गोदावरी नदीची उपनदी नाही?**

अ) पुर्णा ब) प्राणहीता क) भिमा ड) इंद्रावती

**७३. सुलतान अझलनशाह चषक खालील पैकी कोणत्या खेळ प्रकाराशी निगडीत आहे?**

अ) हॉकी ब) फुटबॉल क) कुस्ती ड) पोलो

**७४. नीती आयोगाचे सध्याचे अध्यक्ष कोण आहेत?**

अ) अरविंद पनगारीया ब) अरूण जेटली क) रमेश चंद ड) नरेंद्र मोदी

**७५. एका वर्तुळाचा परिघ ४४ सेंमी असल्यास त्याचा व्यास किती?**

अ) २१ सेंमी ब) ७ सेंमी क) १४ सेंमी ड) २८ सेंमी

**७६. जर २x - १४, तर ७x - ४९ = ?**

अ) १४ ब) ७ क) १ ड) ०

**७७. नटसम्राट या चित्रपटाची प्रमुख भुमिका खालीलपैकी कोणत्या नायकाने भुषविली आहे?**

अ) सदाशीव अमरापूरकर ब) नाना पाटेकर

क) डॉ.श्रीराम लागू ड) सचीन खेडेकर

**७८. मंत्रालय या शब्दाचा प्रचलीत विग्रह सांगा.**

अ) मंत्र+आलय ब) मंत्रा+आलय क) मंत्री+आलय ड) मंत्रा+लय

**७९. खालीलपैकी योग्य जोडी ओळखा.**

अ) नृसिंह मंदिर-पाथरी ब) साईधाम-राणीसावरंगाव

क) नेमगीरी-जिंतुर ड) रेणुकादेवी-पोखर्णी

**८०. निमंत्रीत या शब्दाचा विरूध्दार्थी शब्द ओळखा.**

अ) अकल्पित ब) आगंतुक क) यजमान ड) अनोळखी

**८१. ज्युल हे खालीलपैकी कशाचे एकक आहे.**

अ) उर्जा ब) वजन क) विद्युत प्रवाह ड) वरील पैकी नाही

**८२. महाराष्ट्र राज्याचे सध्याचे गृहमंत्री कोण आहेत?**

www.bhartijahirat.com

अ) आर.आर.पाटील ब) एकनाथ खडसे क) देवेंद्र फडणवीस ड) विनोद तावडे

**८३. १-२+३-४+५-८-१९ = ?**

अ) -२३ ब) २३ क) २४ ड) -२४

**८४. महाराष्ट्राचा राज्य वृक्ष कोणता आहे?**

अ) कडुनिंब ब) आंबा क) साग ड) सूबाभुळ

**८५. पाणी या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा.**

अ) निर्झर ब) उदक क) अंबर ड) वरील पैकी नाही

**८६. जर ASDF = CUFH तर BHJN = ?**

अ) EJLP ब) DILQ क) DILO ड) DJLP

**८७. नांदेड जिल्हा वगळुन खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यांचा समावेश नांदेड पोलीस परिक्षेत्रात होतो?**

अ) परभणी, हिंगोली, जालना ब) परभणी, जालना, बीड

क) परभणी, लातुर, हिंगोली ड) परभणी, लातुर, बीड

**८८. उंट या शब्दाचे स्त्रीलींगी रूप ओळखा.**

अ) उंटीण ब) उंटणी क) सांड ड) सांडणी

**८९. खालील महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची त्यांच्या कालानुक्रमाने सुरूवातीपासून अलीकडच्या काळापर्यंत मांडणी करा.**

१) विलासराव देशमुख २) नारायण राणे ३) शरद पवार ४) अशोक चव्हाण

अ) ३,२,४,१ ब) ३,२,१,४ क) ३,१,२,४ ड) १,२,३,४

**९०. खालीलपैकी कोणाला भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील आद्य क्रांतीकारक म्हणतात?**

अ) विनायक दामोदर सावरकर ब) वासुदेव बळवंत फडके

क) दामोदर हरी चाफेकर ड) वरील पैकी एकही नाही

**९१. दर्पणकार असे कोणास म्हटले जाते?**

अ) बाळशास्त्री जांभेकर ब) लोकमान्य टिळक

क) आगरकर ड) लोकहीतवादी

**९२. महात्मा गांधीजी यांच्या आईचे नांव काय?**

अ) कस्तुरबा ब) कमलाबाई क) पुतलीबाई ड) किरनबेन

**९३. दुरध्वनीचा (टेलीफोन) शोध खालील पैकी कोणी लावला?**

www.bhartijahirat.com

अ) ग्रॅहम बेल ब) सॅम पित्रोडा क) राईट बंधु ड) अल्बर्ट आइन्स्टाईन

**९४. परभणी जिल्ह्याचे सध्याचे पालकमंत्री कोण आहेत?**

अ) बबनराव लोणीकर ब) दिवाकर रावते

क) दिलीप कांबळे ड) सुरेश धस

**९५. पेनिसीलीनचा शोध कोणी लावला?**

अ) फ्लेमिंग ब) आर्चर क) ट्रुमस ड) स्टीफन

**९६. महाराष्ट्र राज्याचे सध्याचे पोलीस महासंचालक कोण आहेत?**

अ) संजीव दयाल ब) प्रविण दिक्षीत क) राकेश मारीया ड) दत्ता पडसलगीकर

**९७. ४ x २ -६० / (३ x ५) = ?**

अ) १५ ब) ४ क) ८ ड) १०

**९८. लेखन नियमानुसार खालीलपैकी अचुक शब्द ओळखा.**

अ) क्षितीज ब) क्षीतिज क) क्षितिज ड) क्षीतीज

**९९. रिझर्व्ह बँकेचे सध्याचे गव्हर्नर कोण आहेत?**

अ) सी रंगराजन ब) रघुराम राजन क) जी सुब्बाराव ड) अरवींद सुब्रम्हण्यम

**१००. पुढील वाक्यातील अधोरेखीत शब्दाची जात ओळखा.**

तुम्ही सर्वजन इथेच थांबा

अ) नाम ब) सर्वनाम क) विशेषण ड) क्रियापद

www.bhartijahirat.com

# उत्तर तालिका

| Q. No. | Set D | Q. No. | Set D | Q. No. | Set D | Q. No. | Set D |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | क | 26 | अ | 51 | ड | 76 | ड |
| 2 | ब | 27 | ब | 52 | अ | 77 | ब |
| 3 | ड | 28 | अ | 53 | क | 78 | अ |
| 4 | ब | 29 | ब | 54 | क | 79 | क |
| 5 | क | 30 | अ | 55 | अ | 80 | ब |
| 6 | ड | 31 | ब | 56 | ब | 81 | अ |
| 7 | क | 32 | ड | 57 | अ | 82 | क |
| 8 | ब | 33 | ब | 58 | ब | 83 | ड |
| 9 | अ | 34 | अ | 59 | ड | 84 | ब |
| 10 | ब | 35 | क | 60 | अ | 85 | ब |
| 11 | अ | 36 | क | 61 | ब | 86 | ड |
| 12 | ड | 37 | ड | 62 | अ | 87 | क |
| 13 | क | 38 | ड | 63 | ब | 88 | ड |
| 14 | क | 39 | अ | 64 | क | 89 | ब |
| 15 | ब | 40 | क | 65 | ड | 90 | ब |
| 16 | ब | 41 | ड | 66 | क | 91 | अ |
| 17 | ब | 42 | अ | 67 | ड | 92 | क |
| 18 | ब | 43 | क | 68 | क | 93 | अ |
| 19 | ड | 44 | ड | 69 | क | 94 | ब |
| 20 | क | 45 | ड | 70 | क | 95 | अ |
| 21 | अ | 46 | अ | 71 | क | 96 | ब |
| 22 | ब | 47 | अ | 72 | क | 97 | ब |
| 23 | ड | 48 | ड | 73 | अ | 98 | क |
| 24 | ब | 49 | ड | 74 | ड | 99 | ब |
| 25 | क | 50 | अ | 75 | क | 100 | ब |

www.bhartijahirat.com